खा.स./वि.का.अ./स्वी.स./मंत्री/वै.शि.व सं.का./व्ही.
श्री. विश्वनाथराव शामराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट संचलित, दिनांक :
# वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर.
(भारतीय दंत परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकशी संलग्न)
कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ३०६
दूरध्वनी (०२३३) २३६४४००, २३६४४०२, फॅक्स (०२३३) २३६४४०८
E-mail : vpdcsangli@gmail.com Web site : www.vpdc.org

खा.स./वि.का.अ./स्वी.स./मंत्री/वै.शि.व सं.का./व्ही.आय.पी./
दिनांक : 26 OCT 2020
२०२६/२०२

संदर्भ क्रमांक : वि.शा.पा./व.पा.दंत.महा.रुग्णा/365/2020-2021 दिनांक : 23/10/2020

प्रति,
मा. ना. अमित विलासराव देशमुखसाहेब,
वैद्यकीय शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

Dir
DMER – examine & pl. do the needful
26/10/20

विषय – वसंतदादा पाटील दंत महाविद्यालयास १०० खाटा भाडेतत्वावर मिळणेबाबत.
संदर्भ– संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे जा.क्र.संवैशिवसं/पवपाशारुसा/वपादंमवरुसां/प्रात्यक्षिक परवानगी/३०१८६/४–अ, दि.११/१०/२०१९ चे पत्र.

मंत्री वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

महोदय,

श्री.विश्वनाथराव शामराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट संचलित, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर ता. मिरज जि. सांगली हे महाविद्यालय सन १९८९ पासून कार्यरत आहे. या महाविद्यालयास पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली यांचेकडून सन २००७ पासून १०० रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवास मिळत होत्या. सदर कराराची मुदत संपत असल्याने पुन्हा आम्हास १०० रुग्णखाटा मिळणेबाबत दि– ०१/०७/२०१९ रोजी मा. सहसंचालक, संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना रीतसर प्रस्ताव पाठविलेला होता. त्यास अनुसरून वरील संदर्भीय पत्रान्वये शिफारस करून सदरचा प्रस्ताव मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई. यांनी मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला मुंबई यांना पाठविलेला आहे.

पुढील दोन वर्षाच्या कालावधीमध्ये आम्ही आमच्या स्वत:च्या जागेमध्ये सुसज्ज असे रुग्णालय सुरु करीत आहोत.

तरी आपणांस या पत्राव्दारे विनंती करण्यात येते की, पुढील दोन वर्षासाठी पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगलीच्या १०० रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवाकरिता वसंतदादा पाटील दंत महाविद्यालयास भाडेतत्वावर मिळणेबाबत शासनाकडुन मंजुरी मिळावी ही विनंती.

कळावे,

आपली विश्वासु,
Jpatil
(जयश्री मदनराव पाटील)
अध्यक्षा,
वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर, सांगली.

सोबत – आवश्यक कागदपत्रे.

महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२३५८/५७/५९, टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२२६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

जा.क्र.संवैशिवसं/पवपाशारुसां/वपादंमवरुसां/प्रात्यक्षिक परवानगी/ 30186 /४-अ, दिनांक: १५/१०/२०१९.

प्रति,

मा.सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.

V. P. D. C. & H.
Inward No. : 1530
Date : 16/10/19

विषय : वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली यांना रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवास मिळणेबाबत...

संदर्भ : १) शासन पत्र क्र.एचएसपी २०१७/प्र.क्र.९२५/१७/शि-१, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७.
२) संचालनालयाचे पत्र क्र.संवैशिवसं/वपादंमवरुसां/प्रात्यक्षिक परवानगी/११५८१/४-अ, दिनांक: ०९/१०/२०१७.
३) प्राचार्य, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली यांचे पत्र क्र.शि.शा.पा./व.पा.दंत.महा.रुग्णा/१९१/२०१९, दिनांक :३०/०४/२०१९.
४) संचालनालयाचे पत्र क्र. संवैशिवसं/पवपाशारुसां/वपादंमवरुसां/प्रात्यक्षिक परवानगी /९९७७/४-अ, दिनांक:२०/०६/२०१९.
५) अधिष्ठाता, प.व.पा.शा.रु., सांगली यांचे पत्र क्र.पवपाशारुसां/व.पा.दं.म.रु.क./१२०३९-४०/२०१९, दिनांक १९/०८/२०१९.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये शासनाने पदमभुषण वसंतदादा पाटील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सांगली येथील रुगणखाटा वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली या संस्थेस शैक्षणीक प्रयोजनार्थ देण्याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्यास निर्देशित केले होते.

उक्त शासन निर्देशास अनुसरुन संचालनालयाच्या संदर्भ क्र. २ व ४ च्या पत्रान्वये प्रस्तावित संस्थेच्या विद्यार्थ्यांना प.व.पा.शा.रु., सांगली येथील रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवासाठी देण्याकरीता शासनाने विहित केलेल्या विवरणपत्रात ('अ' व 'ब') आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार अधिष्ठाता, प.व.पा.शा.रु., सांगली यांनी संदर्भ क्र. ५ अन्वये वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली या महाविद्यालयास डॉ प.व.पा.शा.रु., सांगली येथील रुगणखाटा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यास दिल्यास संस्थेत सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमांवर कोणताही परिणाम होणार नाही याची खातरजमा केली असल्याबाबत अभिप्राय दिले आहेत.

(कृ.मा.प.)

खाजगी संस्थेस रुग्णखाटा निरिक्षणासाठी परवानगी देण्यापुर्वी संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व खाजगी संस्था यांचे दरम्यान शासनाने शासन निर्णय दिनांक १२/१२/२०१७ अन्वये विहित केलेल्या अटि व शर्तीनसार करार होणे आवश्यक आहे. अतएवं अधिष्ठाता, प.व.पा.शा.रु., सांगली यांनी विषयांकीत प्रकरणी शासनाने विहित केलेल्या प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये संचालनालयास सादर केलेल्या अभिप्रायाच्या अधिन राहून शासनास शिफारशीसह प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

प्रत : माहितीस्तव.

१) अधिष्ठाता, प.व.पा.शा.रु., सांगली

२) प्राचार्य, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली

महाराष्ट्र शासन

# पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली - ४१६ ४१६

## Padmabhushan Vasantdada Patil Govt. Hospital, Sangli.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज या संस्थेशी सलग्न शैक्षणिक रुग्णालय

2374651 to 2374654 (PBX)Fax No. 0233/2374585 email id – pvpghsangli@yahoo.co.in

जा.क्र.पवपाशारुसां/व.पा.दं.म.रु.क./ १२०३९-४/२०१९, दिनांक :-१९/०८/२०१९.

प्रति,
मा.संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
महाराष्ट्र शासन,
मुंबई - ४०० ००१.

V. P. D. C. & H.
Inward No. : 1372
Date : 28/9/19

विषय :- वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली यांना रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवास मिळणेबाबत...

संदर्भ :- आपले पत्र क्र.संवैशिवसं/पवपाशारुसां/वपादंमवरुसां/प्रात्यक्षिक परवानगी/ ९९७७/२०.०६.२०१९.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली येथील रुग्णखाटा वसंतदादा दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, सांगली या संस्थेस शैक्षणिक प्रयोजनार्थ देण्याबाबत शासनाने विहित केलेल्या विवरणपत्रात ("अ" व "ब") मध्ये रुग्णालयाची माहिती स्वयंस्पष्ट अभिप्रायासह योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर यांनी विवरणपत्र "अ" ची माहिती या कार्यालयास दिनांक २५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अग्रेषित केलेली असून ती सोबत सादर करण्यात येत आहे. तसेच या रुग्णालयाची विवरणपत्र "ब" ची माहिती स्वयंस्पष्ट अभिप्रायासह योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

सोबत - वरील प्रमाणे.

(डॉ.पल्लवि प्रभाकर सापळे)
अधिष्ठाता,
पद्मभूषण वसंतदादा पाटील
शासकीय रुग्णालय, सांगली.

प्रत - प्राचार्य, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय व रुग्णालय, कवलापूर, ता.मिरज,

V. P. D. C. & H.
Inward No. : 1688
Date : 13/12/12

**महाराष्ट्र शासन**

क्र.एचएसपी-२०११/प्र.क्र.९२५/११/शिक्षण-१
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालय परीसर, मुंबई
दिनांक: ७ डिसेंबर, २०१२

प्रति,
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय परीसर,
मुंबई - ०१

**विषय:-** **वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर या महाविद्यालयाला पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली येथे १०० खाटा प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी वापरण्याबाबत.**

**संदर्भ:-** १) संस्थेचे दि.०४/१०/२०११ चे पत्र
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रसंवैशिवसं/पद्वपाशारुसां/वपादंमरूकवलापूर/खाटा/३-अ दि.१९/०३/२०१२ चे पत्र.
३) अधिष्ठाता, **पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली** यांचे पत्र क्र. जा.क्र.पवपाशारुसां/व.पा.दं.म.कवलापूर/३२८४/२०१२ दि.०३/०३/२०१२

उपरोक्त विषयावरील प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणास असे कळविण्याचे निदेश आहे की, **वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर** या संस्थेच्या बीडीएस व एमडीएस या अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना **पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली** येथे प्रात्यक्षिक अनुभवासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार, या महाविद्यालयाच्या बीडीएस व एमडीएस या अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ५ (पाच) वर्षाच्या कालावधीसाठी सदर चिकित्सालयीन सुविधेचा लाभ घेता येईल.

**अटी व शर्ती**

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सुरु असणा-या तसेच नजीकच्या भविष्यकाळात सुरु करावयाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी, संबंधीत केंद्रीय परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक असणा-या खाटा वगळून उर्वरीत खाटा सदर संस्थेच्या बीडीएस व एमडीएस या अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक अनुभवासाठी वापरण्यास परवानगी देण्यात येईल.
२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील खाटा वापरण्याची सदर सुविधा तात्पुरत्या स्वरुपात म्हणजे अधिष्ठातांनी परवानगी दिल्यापासून ५ (पाच) वर्षाच्या कालावधीसाठी असून या कालावधीत संस्थेला स्वतःची चिकित्सालयीन सुविधा उपलब्ध करुन घ्यावी लागेल.
३) तसेच सदर परवानगीचे दर वर्षी नुतनीकरण करणे संस्थेस अपरिहार्य राहील.
४) खाटा वापरण्यास परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्षात वापर सुरु करण्यापूर्वी शासन निर्णय दि. २५/८/२००९ अन्वये विहित केलेल्या नमून्यातील करारपत्र संस्थेच्या वतीने जबाबदार पदाधिका-यांनी स्वाक्षांकीत करुन द्यावे लागेल. शासनाच्या वतीने सदर करारनामा स्विकृत व

स्वाक्षरीत करण्यासाठी अधिष्ठाता, **पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली** यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५) रुग्णालयातील चिकित्सालयीन सुविधा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यास शासन निर्णय दि. २५/८/२००९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क संबंधीत अभ्यासक्रमांसाठी मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेनुसार आकारण्यात येईल.

६) कराराच्या कालावधीसाठी संस्थेने, पुढील प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधीचे शुल्क पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत अग्रीम स्वरुपात संबंधीत वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांकडे जमा करावे. अधिष्ठाता यांनी प्राप्त शुल्काची रककम महाविद्यालयाच्या स्वीयप्रपंची खात्यात जमा करावी. **विहित शुल्क जमा केल्यानंतरच चिकित्सालयीन सुविधेचा प्रत्यक्ष वापर करण्यास अधिष्ठातांनी परवानगी द्यावी.**

७) संस्थेने करारातील कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास त्यांना दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल. तसेच **कराराचा कालावधी संपल्यानंतर सदर करार आपोआप संपुष्टात येईल.**

८) तसेच सदर कालावधीमध्ये जर शासनाचे भौतिकोपचार महाविद्यालय सुरु झाले तर संस्थेस दिलेली परवानगी आपोआप संपुष्टात येईल.

९) संस्थेने विद्यार्थ्यांसाठी चिकित्सालयीन सुविधा वापरतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शैक्षणिक व अशैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत. याबाबतची व्यवस्था संस्थेने स्वत: करणे बंधनकारक राहील.

१०) संस्थेने चिकित्सालयीन सुविधेचा वापर करतांना वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर व रुग्णालयातील रुग्णसेवेवर तसेच रुग्णालय प्रशासनावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११) ज्या अभ्यासक्रमासाठी चिकित्सालयीन सुविधा वापरण्यास परवानगी देण्यात आलेली असेल त्याच अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी सदर सुविधेचा वापर करणे बंधनकारक राहील. अन्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी सदर सुविधेचा वापर केल्याचे आढळून आल्यास करार आपोआप रद्द होईल.

१२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये प्रशिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व रुग्णालयाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

(अ.मा.आत्राम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१) अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली

२) अधिष्ठाता, **वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर,ता.मिरज,जि.सांगली**

श्री विश्वनाथराव शामराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट संचलित,
**वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रूग्णालय, कवलापूर.**
(भारतीय दंत परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकशी संलग्न)
कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ३०६.
दूरध्वनी (०२३३)२३६४४००, २३६४४०२, फॅक्स (०२३३) २६४४४०४
E-mail: vpdcsangli@gmail.com Web site : www.vpdc.in

संदर्भ क्रमांक : वि.शा.पा./व.पा.दंत.महा.रूग्णा/ 187/22-23 दिनांक : 24/5/2022

प्रति,
मा. सहसंचालक (वैद्यकीय )
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
फोर्ट, मुंबई – ४०० ००१

विषय : आमच्या वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय कवलापूर – सांगली यांना रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवण्यास मिळणे बाबत..

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने आमच्या वसंतदादा पाटील दंत महाविद्यालयास सांगली येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथील १०० रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवण्यास मिळणे करीता आम्ही शासनाकडे परवानगी मागितलेली आहे.

तरी वरील विषयास अनुसरुन आमच्या संस्थेची संपूर्ण माहिती विवरण पत्र अ मध्ये भरुन आपणाकडे सादर करीत आहोत.

तरी आमच्या महाविद्यालयास सांगली येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयातील १०० रुग्णखाटा प्रात्यक्षिक अनुभवण्यास देण्याबाबत आपणास नम्र विनंती आहे.

कळावे

सोबत : प्रपत्र अ

आपली विश्वासू

Bheda
प्राचार्या,
वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि
रुग्णालय, कवलापूर–सांगली. ४१६ ३०६

प्रत माहितीसाठी :
मा. आधिष्ठाता,
पद्मभूषण वसंतदादा पाटील
शासकीय रुग्णालय सांगली

o/c

Clerk
Medical Education and Research
Mumbai

श्री. विश्वनाथराव शामराव पाटील चॅरीटेबल ट्रस्ट संचलित,

**वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, कवलापूर.**

(भारतीय दंत परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकशी संलग्न)

कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ३०६.

दूरध्वनी (०२३३) २३६४४००, २३६४४०२, फॅक्स (०२३३) २६४४४०४

E-mail : vpdcsangli@gmail.com Web site : www.vpdc.org

संदर्भ क्रमांक : वि.शा.पा./व.पा.दंत.महा.रुग्णा/ 161/22-23 दिनांक : 18/5/2022

मा.सचिव,
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालय संकूल इमारत, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय
मुंबई

विषय : आमच्या महाविद्यालयास रुग्ण खाटा प्रात्यक्षिक अनुभवास मिळणे बाबत.

संदर्भ : १) महाविद्यालय पत्र क्र.विशापा/वपादंत महारुग्णा/२६५/२०२०-२१ दिनांक २३/१०/२०२० चे पत्र.
२) जा.क्र.संवैशिवसं/पवपाशारुसां/वपादंमवरुसां/प्रात्याक्षिक परवानगी/३०१८६/४ अ/ दिनांक १५/१०/२०१९
३) अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकिय रुग्णालय, सांगली यांचे पत्र क्र.पवपाशारुसां/ वपादंमरुक/ १२०३९-४० /२०१९ दिनांक १९/०८/२०१९
४) महाराष्ट्र शासन पत्र क्र.एचएस्पी-२०११/प्र.क्र.९२५/११/शिक्षण-१/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोते रुग्णालय परिसर, मंत्रालय, मुंबई दिनांक ०७/१२/२०१२

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने आमच्या महाविद्यालयास पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथील प्रात्याक्षिक व शिक्षणासाठी १०० खाटा वापरण्यासाठी संदर्भीय पत्र क्र.४ अन्वये वापरण्यास परवानगी दिलेली होती. त्याची मुदत संपलेली असून पुन्हा आम्हास सदर पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथील प्रात्याक्षिक व शिक्षणासाठी १०० खाटा वापरण्यासाठी ५ वर्षाची मुदत वाढ मिळण्या करीता वरील संदर्भीय पत्रान्वये विनंती करीत आहोत.

मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मंबई यांनी संदर्भीय पत्र क्र.संवैशिवसं/ पवपाशारुसां/ वपादंमवरुसां/ प्रात्याक्षिक परवानगी/३०१८६/४ अ/ दिनांक १५/१०/२०१९ अन्वये आपणाकडे आम्हास वरील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथील प्रात्याक्षिक व शिक्षणासाठी १०० खाटा वापरण्यासाठी देण्या बाबत शिफारस केली आहे.

तरी आपणास या पत्राव्दारे विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक व शिक्षणासाठी सांगली येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयातील १०० खाटा वापरण्यासाठी ५ वर्षाची मुदत वाढीची परवानगी द्यावी हि विनंती.

कळावे,

सोबत : वरील प्रमाणे

25/5/22

लिपिक, नोंदणी शाखा

प्राचार्या,
वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय आणि